# मनोगत...

'माणकेश्वरची शिव - सटवाई उत्सव आणि आख्यायिका' या विषयावरील एम्. फिल. (मराठी) या पदवी परीक्षेसाठी प्रबंधिका सादर करताना मला वाटणारे समाधान प्रारंभीच व्यक्त करतो.

एम्. ए. चा विद्यार्थी असल्यापासून ते माझ्या प्रबंधिकेचे मार्गदर्शक अशी दुहेरी भूमिका पार पाडून मला घडवणारे डॉ. विश्वनाथ शिंदे सर यांच्याविषयी प्रथम कृतज्ञता व्यक्त करणे अगत्याचे वाटते. त्यांच्या लोकसाहित्य अध्यापनाच्या कौशल्यातूनच मी सदर विषयाच्या संशोधनाकडे ओढला गेलो. त्यांच्यातील उत्कृष्ट प्रशासक, अभ्यासू व शिस्तबद्ध व्यक्तिमत्त्व, विद्यार्थीप्रिय आदर्श शिक्षक असे अनेक गुण मला भावी आयुष्यात नेहमीच मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरतील.

मराठी विभाग प्रमुख डॉ. कृष्णा किरवले, डॉ. रवींद्र ठाकूर, हिमांशू स्मार्त, रणधीर शिंदे, विभागातील कनिष्ठ लिपिक विनय पाटील, सेवक सतीश कुसुंबे या सर्वांचा मी ऋणी आहे.

कोणतेही संशोधन अंतिम स्वरूपाचे नसते. त्यात नवनवीन माहिती उपलब्ध झाल्यास परिवर्तन होऊ शकते. या मतावर माझाही विश्वास आहे. या प्रबंधाच्या माहितीस्तव ज्यांनी ज्यांनी मला अत्यंत स्नेहाने व आपुलकीने सहाय्य केले त्या सर्वांचेही मी येथे मन:पूर्वक आभार मानतो. वृद्ध स्त्री- पुरूषांकडून तसेच अनेकांची प्रसंगी मनधरणी करून, पै-पाहुण्यांची ओळख पटवून सर्व माहिती लेखणीच्या तसेच ध्वनिमुद्रणाच्या सहाय्याने शेतात, घरात, मंदिरात जाऊन गोळा केली. माणकेश्वर आणि परिसरातील लोकांनी वेळ, काळ विसरून,

वयाचे भान विसरून त्यांच्या जवळील मौखिक वाङ्मयाचा ठेवा निरपेक्ष भावनेने मला सुपूर्द केल्यामुळेच ही प्रबंधिका पूर्ण होऊ शकली. सदरची संकलित माहिती आणि विश्लेषण निश्चितच उपयोगी ठरेल असा विश्वास वाटतो.

या विषयाच्या संशोधनास विपुल अशी संदर्भ साधने उपलब्ध नव्हती, होती तीही एक ते दोनच ओळींची त्रोटक माहिती देत असत. सर्व संदर्भ मौखिक स्वरूपात मिळाले. क्षेत्रीय अभ्यासात लोकात मिसळताना प्रथम मानसिक, शारीरिक, आर्थिक त्रास झाला; परंतु शेवटी संकलनामध्ये रूची निर्माण झाली. प्रा. भारती खेडकर, प्रा. राजेंद्र दास, डॉ. बी. डी. पारसे, डॉ. शिवाजी करडे, प्राचार्य डॉ. मधुकर फरताडे, प्राचार्य बाळासाहेब दास, प्राचार्य मानवेंद्र जाधव, मात्रे मित्र डॉ. साताप्पा चव्हाण, प्रा. भाऊसाहेब नवले, प्रा. अनंता कस्तुरे, प्रा. गजानन अपिने, प्रा. सुनिल भिसे, प्रा. मानसिंग दबडे, प्रा. सिद्धेश्वर जाधव, प्रा. तुकाराम सोलापुरे, प्रा. अमर माने, प्रा. कृष्णत सपकाळ, प्रा. उत्तम कांबळे, प्रा. राजेंद्र लादे, प्रा. व्ही. एम्. नलवडे, प्रा. एच्. यु. नलवडे, प्रा. जयश्री पवार, प्रा. राणी पवार, सोपान जाधवर, राजाभाऊ जाधवर, जावेद शेख, मारुती तुपेरे, सर्जेराव कांबळे, प्रदीप कांबळे, चंद्रकांत कदम, दत्ता घोलप, खंडेराव खळदकर, संजय बाबर तसेच विद्यार्थी यांचाही मी मन:पूर्वक आभारी आहे.

नेहमी कष्ट करण्यास सांगणारे वडील आणि सतत आत्मविश्वास वाढवणारी आई ह्यांचे माझ्या आजपर्यंतच्या जीवनप्रवासात मोलाचे स्थान आहे. माझे बंधू पोलीस उपअधिक्षक श्री. राजकुमार शिंदे, कृषि सहाय्यक हनुमंत शिंदे, संतोष शिंदे, बहीण सौ. मंगल दास, मेहुणे श्री. विष्णु दास ह्यांच्या शुभेच्छांमुळे हे संशोधन करणे मला सोपे झाले.

याबरोबरच विविध गावची ग्राम वाचनालये, औरंगाबादचा पुरातत्त्व

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

विभाग, का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, महाविद्यालयातील तसेच शिवाजी विद्यापीठातील ग्रंथालयामुळे या विषयाशी निगडीत माहिती मिळाली. प्रबंधामधील दुर्मिळ छायाचित्रे डॉ. रजनी जोशी तसेच इतापे यांनी उदार मनाने दिली. पंचक्रोशीतील ग्रामस्थांचे सहकार्य तसेच श्रीकांत कॉम्प्युटर्स, कोल्हापूर यांनी सुबकपणे मुद्रण करून दिल्याबद्दल ज्ञात तसेच अज्ञात अशा सर्व व्यक्तींचा मी ऋणी आहे.

**नवनाथ अंगद शिंदे**